**नवीन भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 नुसार कलम 21 (1) खालील नोटीस**

क्र.2015 /उविअभूसं/नांदेड/सिआर-09
उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी नांदेड
दिनांक :- 13/07/2017

## जाहिर नोटिस

समुचित शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम 19 खालील अधिसुचना निर्गमित केली व ती खालील प्रमाणे प्रसिध्द केली आहे.

1.महाराष्ट्र राज्य राजपत्र पान क्र 915 दिनांक 1-7 जुन 2017
2.स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी
अ.दैनिक टाइम्स ऑफ गौरव दिनांक 05/05/201705/05/2017
आ.दैनिक गोदावरी ऑब्जर्वर (उर्दू )नांदेड दिनांक 05/05/2017
3अ.जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे प्रसिंध्दी दिनांक 15/06/2017 इ.उपविभागीय अधिकारी कार्यालय नांदेड येथे प्रसिध्दी दिनांक 15/06/2017 ई.तहसिल कार्यालय अर्धापूर मध्ये प्रसिध्दी दिनांक 03/05/2017
4.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी दिनांक
5. बाधीत क्षेत्राच्या ठिकाणी अर्धापूर ता.अर्धापूरजि.नांदेड येथे प्रसिध्दी दिनांक 04/07/2017

आणि अधिसुचनेप्रमाणे अधिसुचित केलेले परिशिष्ट मधील जमीन भूसंपादन प्रस्ताव - निमगांव शाखा कालवा कि.मी. 15 मधील एस्केप चॅनलच्या कामासाठी मौ. दाभड ता.अर्धापूर जि.नांदेड येथील भूमी संपादन करण्याबाबत.

आपण उपरोक्त अधिसुचित जमीनीमध्ये हितसंबंधीत व्यक्ती असल्यास आपणास जाहिररित्या कळविण्यात येते की, शासन सदर जमिनीचा ताबा घेऊ इच्छिते. आणि आपणास सुचित करण्यात येते की, आपणास सदर भूसंपादन बाबत खालील मुद्दयांवर कोणताही आक्षेप असल्यास आपण स्वतः, अभिकर्त्या मार्फत किंवा वकीलामार्फत खालील सही करणार **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी नांदेड यांचे कार्यालय प्रशासकिय इमारत, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड** येथे कार्यालयीन वेळेत ही नोटीस निर्गमित झाल्यानंतर दिनांक 31/07/2017 रोजी खालील मुद्दयांवर आपला लेखी आक्षेप/दावा दाखल करावा.

अ. सदर जमिनीत असलेल्या आपल्या हितसंबंधाचे स्वरुप,
आ. सदर हितसंबंधाच्या अनुषंगाने आपण मागणी करत असलेली भरपाईची रक्कम
इ. पुनर्वसन व पुनःस्थापना याबाबत आपण करत असलेली मागणी आणि कलम 20 अंतर्गत केल्या जाणा-या मोजणीबाबत काही आक्षेप (असल्यास )

आपणास कळविण्यात येते की, ही अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून व सदर अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही पूर्ण होईल. अशा वेळेपर्यंत अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमीनीबाबत कोणताही व्यवहार करु नये किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करण्यास याव्दारे आपणास प्रतिबंध करण्यात येत आहे.

**संपादित होत असलेल्या आणि ताब्यात घेतल्या जाणार असलेल्या जमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | संचिका क्र. | गाव/तालुका/जिल्हा | गट क्र. | संपादन करावयाचे क्षेत्र | भूसंपादनाचा उद्देश |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2015/09 | दाभड<br>ता.अर्धापूर जि.नांदेड | 281 | 0.11 हे. आर | निमगांव शाखा कालवा कि.मी. 15 मधील एस्केप चॅनलच्या कामासाठी मौ. दाभड ता.अर्धापूर जि.नांदेड येथील भूमी संपादन करण्याबाबत. |

आपणास असेही सुचित करण्यात येते की, आपला दावा लेखी स्वरुपात असावा आणि आपण किंवा आपले अधिकृत प्रतिनिधी यांनी स्वतः स्वाक्षरीत केलेला असावा.

उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी नांदेड